# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 341 /2020 दिनांक: 22 /05/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897

**खाजगी रुग्णालयांमध्ये कोविड-१९ या आजारावर वैद्यकिय उपचार करण्यास प्रतिबंध.**

जिल्हादंडाधिकारी अकोला

## आदेश

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि,**

**ज्याअर्थी,** असे निदर्शनास आले आहे की, अकोला शहरामध्ये आज दिनांक 22/05/2020 ला साधारण 60 प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) तयार करण्यांत आले आहेत. या प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) मध्ये काही व्यक्तींना कोरोना विषाणुची लक्षणे दिसून आल्यामुळे काही खाजगी हॉस्पीटलमध्ये त्या रुग्णांना भरती करुन उपचार करण्यांत येत आहेत, तसेच त्यांना शेवटच्या टप्प्यात हि लक्षणे अति तीव्र स्वरुपाची झाल्यानंतर शासकीय वैद्यकिय महाविद्यालयात संदर्भीत करण्यांत येते. त्यामुळे शेवटच्या टप्प्यात रुग्ण दाखल केल्यानंतर रुग्णांवर उपचार करण्याकरीता पुरेसा वेळ मिळत नाही परिणामी रुग्ण दगावतो. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अकोला जिल्ह्यात कोविड-19 या आजारामुळे मुत्यूमुखी पडणा-या रुग्णांचे प्रमाण कमी करण्याचे दृष्टीने अशा रुग्णांवर खाजगी रुग्णालयात वैद्यकिय उपचार करण्यास प्रतिबंधीत करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे. **आणि,**

**त्याअर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला, आपत्ती व्यवस्थापन कायदा-** 2005, **साथरोग अधिनियम** 1897 **मधील खंड** 2, 3 **व** 4 **व महाराष्ट्र शासनाची दिनांक** 14 **मार्च** 2020 **चे अधिसूचना** अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, खालील प्रमाणे आदेशीत करीत आहे.

1. कोरोना विषाणुची लक्षणे आढळून आलेल्या प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) मधील नागरीकांनी त्यांना कोरोना विषाणुबाबत सर्दी, खोकला, ताप व श्वास घेण्यास त्रास असल्यास त्यांनी तात्काळ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथे तपासणी करीता जावे.
2. खाजगी रुग्णालयांमध्ये अशा प्रकारचे रुग्ण आल्यास त्यांना तात्काळ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथे पाठविण्यांत यावे.
3. रुग्णामध्ये लक्षण दिसुन आल्यानंतर सुध्दा खाजगी दवाखान्यात भरती ठेवण्यांत येते, अति शेवटच्या टप्प्यामध्ये शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथे पाठविण्यांत येते. त्यामुळे खाजगी डॉक्टर्सना निर्देशित करण्यांत करण्यांत येते की, रुग्णांना लक्षणे दिसून आल्यास त्यांना तात्काळ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथे पाठविण्यांत यावे.
4. शासकीय महाविद्यालयात कोरोना विषाणुबाबतची लक्षणे दिसल्यास त्यांच्यावर प्रभावीपणे उपचार पध्दतीचा वापर करुन उपचार करण्यांत यावेत.

सदर आदेश नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पारीत करण्यात येत असल्यामुळे तात्काळ लागू करण्यात येत आहे.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक 22 मे** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी** —

1. मा. आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
3. आयुक्त, महानगरपालिका अकोला
4. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
5. जिल्हा शल्य चिकित्सक सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
6. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोशिएशन, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. उपविभागीय अधिकारी, अकोला/ अकोट/ बाळापूर/ मुर्तिजापूर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**